# जाहीर प्रगटन

## पोलीस पाटील पदभरतीसाठी जाहिरात 2024

## उपविभाग परभणी.

परभणी जिल्हयातील उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय परभणी अंतर्गत गाव पोलीस पाटील पद भरतीसाठी अर्हता धारक उमेदवारांकडून विहित नमुण्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच https://parbhani.gov.in किंवा https://parbhani.applygov.net संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | 15/01/2024 वेळ 10.00 वा. पासून |
| ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत | 23/01/2024 वेळ रात्री 11.00 वा. पर्यंत |
| परिक्षा फिस | खुला प्रवर्ग - 800/- रु.<br>मागासप्रवर्गासाठी - 700/- रु |
| लेखी परिक्षा | 28/01/2024 |
| अर्हता | 1. एस.एस.सी (10 वी) उत्तीर्ण<br>2. संबंधीत गावचा रहिवाशी असावा.<br>3. वय दि. 15.01.2024 रोजी अर्जदाराचे वय 25 ते 45 दरम्यान असावे.<br>4. जाहिरातीनुसार इतर आवश्यक कागदपत्रे |

पोलीस पाटील भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर जाहिरात https//parbhani.gov.in किंवा https//parbhani.applygov.net संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचुनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीनेच भरलेले अर्ज व विहित पध्दतीने भरलेल्या प्रक्रिया शुल्कासह ग्राहय धरण्यात येतील इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती बाबत अदयावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया / परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशता बदल करणे, पदाच्या एकुण गावनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट तसेच आरक्षणात बदल करण्याचे अधिकार तसेच प्रक्रिये संदर्भात प्राप्त तक्रारीबाबत निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार संबंधीत उपविभागीय दंडाधिकारी तथा अध्यक्ष, पोलीस पाटील निवड समिती यांना राहील.

दिनांकः 12/01/2024

ठिकाणः- परभणी

**उपविभागीय दंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**पोलीस पाटील निवड समिती, परभणी.**

mygovnaukari.com

# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्रमांक : 02452-226537 ई-मेल : sdoparbhani@yahoo.com

जा.क्र.2024/पो.पा./आस्था/सिआर-1 दिनांक :- 12/01/2024

## जाहीर प्रगटन

**परभणी जिल्हयातील, परभणी उपविभागातील ANNEXURE- A प्रमाणे रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरणेबाबत**

परभणी जिल्हयातील परभणी उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील गावात पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीने **https://parbhani.gov.in किंवा https://parbhani.applygov.net**या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | 15/01/2024 वेळ 10.00 वा.पासून |
| 2 | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत | 23/01/2024 वेळ रात्री 11.00 वा. पर्यंत |
| 3 | पात्र/अपात्र उमेदवारांचे अर्जाची छाननी करुन यादी प्रसिध्द करणे | 23/01/2024 |
| 4 | पात्र/अपात्र उमेदवारांचे यादीवर आक्षेप व निराकरण करणे सायंकाळी 05.00 वाजे पर्यंत | 24/01/2024 |
| 5 | पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र निर्गमीत करणे (संबंधीत उमेदवारानी संकेतस्थळावरुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावेत) | 24/01/2024 ते 28/01/2024 |
| 6 | प्रवेशपत्र न मिळालेल्या उमेदवारांना उप विभागीय कार्यालयातून प्रवेश उपलब्ध करुन देणे | 27/01/2024 |
| 7 | लेखी परिक्षेचा दिनांक | 28/01/2024 (जिल्हास्तरावर) |
| 8 | उत्तर तालीका प्रसिध्द करणे | 28/01/2024 |
| 9 | प्रश्नपत्रिका व उत्तर तालीके बाबत आक्षेप व हरकती सादर करणे | 29/01/2024 सायंकाळी 6.00 पर्यंत (जिल्हा/उपविभाग स्तरावर) |
| 10 | अंतिम उत्तर तालीका प्रसिध्द करणे | 30/01/2024 सकाळी 10.00 |
| 11 | मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | 30/01/2024 (संबंधीत उपविभागस्तरावर/संकेतस्थळावर) |
| 12 | मुलाखतीचा दिनांक | संकेतस्थळावर कळविण्यात येईल. |
| 13 | अंतिम निकाल जाहिर करणे | संकेतस्थळावर कळविण्यात येईल. |

**परिक्षा शुल्क खालील प्रमाणे विहित पध्दतीने भरावे लागेल**

| | | |
|---|---|---|
| खुला प्रवर्ग | **-रुपये 800/-** | **संकेतस्थळावर अर्ज भरतांना त्याच वेळी परिक्षा शुल्क ऑनलाईन अदा करणे बंधनकारक राहील.** |
| आरक्षीत /आर्थीक दुर्बल घटक प्रवर्गासाठी | **-रुपये 700/-** | |

mygovnaukari.com

सरळसेवाभरती प्रक्रीयेची सविस्तर जाहीरात https://parbhani.gov.inकिंवा https://parbhani.applygov.netया संकेतस्थळावर उपलब्ध होईल.अर्जदाराने संपूर्ण प्रक्रीया काळजीपुर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत.पोलीस पाटील पदाचे परिक्षेचे अर्ज व परिक्षा शुल्क फक्त ऑनलाईनपध्दतीनेच स्विकारले जातील. इतरकोणत्याही प्रकारे परिक्षा शुल्क स्विकारण्यात येणार नाही.सदर ऑनलाईन अर्ज दिनांक 23.01.2024 पर्यंत रात्री 11.00 पर्यंत सादर करावा. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावर विहीत ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. सदर संकेतस्थळावर भरतीप्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्यावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. भरणा केलेले परीक्षा शुल्ककोणत्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही.

भरती प्रक्रिया परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे पदाच्या एकूण व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचेअधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संबंधीत उपविभागीयदंडाधिकारी यांनी राखूनठेवले असून त्यांचा निर्णयअंतिम असेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. संबंधीत उपविभागातीलपोलीस पाटलांची मंजूरपदे, रिक्त पदे, तसेच 30% महिलांसाठी आरक्षित ठेवलेली पदे विचारात घेवून सद्यस्थितीत जी पदे भरणे आवश्यक आहे, त्याबाबतची उपविभागनिहाय माहिती सोबत जोडलेले **ANNEXURE A**मध्ये दर्शविलेली आहे.

**<u>पोलीस पाटील पदासाठी किमान आवश्यक अर्हता :-</u>**

1) अर्जदार हा दहावी (एस. एस. सी) उतीर्ण असावा.

2) (अ) वयोमर्यादेकरीता अर्जदाराचे दिनांक 15/01/2024 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

(ब) अर्जदाराचे वय दिनांक 15/01/2024 रोजी 25 वर्षा पेक्षा कमी नसावे व 45 वर्षा पेक्षा जास्त नसावे.

(क) पोलीस पाटील पदांकरीता वयोमर्यादा शिथिलक्षम नाही.

3) अर्जदार हा संबंधीत गावचा स्थानिक व कायम रहिवाशी असावा.(तहसिलदार किंवा तलाठी यांचे रहिवासाबाबतचे प्रमाणपत्र)

4) अर्जदाराने अर्जामध्ये स्वतःचा आधार क्रमांक वमोबाईल नंबर नमूद करावा.

5) अर्जदार शारीरिकदृष्टया **सक्षम असावा** व अर्जदाराचे **चरित्र्य निष्कलंक असणे आवश्यक** आहे.

6) महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटुंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटुंबाची अर्हता धारण करणे आवश्यक (अर्जदार यांना अर्हता दिनांकास **दोन** पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)

7) प्रवर्ग निहाय आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**8) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज-ब, क, ड या प्रवर्गातील अर्जदार यांना सन 2022-23 या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र आवश्यक राहील.**

9) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) करीता आरक्षीत जागेसाठी वर्ष 2023-24 चे तहसिलदार यांनी निर्गमित केलेले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक(EWS)प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**<u>परीक्षेचे स्वरुप :-</u>**

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | परीक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| 1 | पोलीस पाटील | लेखी परीक्षा | तोंडी परीक्षा(मुलाखत) | एकुण गुण |
| | | **80** | **20** | **100** |

myjgovnaukari.com

**लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालील प्रमाणे राहील :-**

1. पोलीस पाटील पदाची लेखी परिक्षा 80 गुणांची असेल. प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील, लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाचीअसेल.

2. लेखी परीक्षा इयत्ता दहावी (एस. एस. सी.) पर्यतच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल यात सामान्य ज्ञान, गणित, पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य, बुध्दीमत्ता चाचणी, स्थानिक परिसराची माहिती व चालु घडामोडी इत्यादी विषयाचा समावेश असेल.

3. **तोंडी परीक्षेकरीता किमान गुण**

पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यात येणा-या 80 गुणांच्या लेखी परीक्षेत किमान 36 गुण (45%) प्राप्त करणारे उमेदवार तोंडी परीक्षेस पात्र ठरतील. परंतू एका पदास गुणवत्तेप्रमाणे सर्वाधिक गुण मिळालेल्या पाच उमेदवारांना मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.

4. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम/2010/2009/प्र.क्र.66/10/13-अ दिनांक 16/06/2010 मधील तरतुदीनुसर लेखी परीक्षा घेतेवेळी उत्तरपत्रिकेवर उत्तर लिहीण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी **फक्त काळया शाईचा बॉलपेन वापर करावा** लागेल.

**निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती :-**

1. प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांस शैक्षणिकपात्रता व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करून द्यावे लागतील, अन्यथा तोंडी परीक्षा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.
2. लेखी परीक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्याकरीता करण्यात येईल.जाहिरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होवू शकेल. तसेच अशा अर्जदाराचे परिक्षा शुल्क इत्यादीसारख्या सवलती नामंजुर करण्यात येतील याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
3. अर्जदार शारिरीकदृष्ट्या सक्षम असल्याबाबतचे अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय यांचे अथवा वरीष्ठ वैद्यकीय अधिका-यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळीसादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकीय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.
4. अर्जदाराचेचारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे <u>**चारित्र्यप्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या**</u> वेळी सादर करणे आवश्यक राहील.
5. अर्जदारांचे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसावा. त्याचप्रमाणे इतर ठिकाणी संपूर्ण वेळ नोकरी करणारा नसावा. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा अथवा पुर्णवेळ नोकरी करणारा नसावा याबाबतचे रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
6. पोलीस पाटील पदावरील नियुक्तीकरीता मृत / सेवानिवृत पोलीस पाटलांच्या वारसांनी अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसांची निवड करण्यास प्राधान्य देण्यात येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्रामपोलीस पाटील (सेवा, प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती)

mygovnaukari.com

आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार त्या गावांसाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक/समांतर आरक्षणाचा असला पाहिजे.

7. अर्जदार संबंधीत गावचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
8. अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवासी असू शकतो. सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातुन केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.
9. प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकिय निकषानुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षणा व्यतिरिक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये.)
10. **परभणी जिल्ह्यातील पोलीस पाटील पदभरती-2024 ची परीक्षा जिल्हास्तरावरएकाच दिवशी व वेळी घेण्यात येईल.**
11. संपूर्ण भरती प्रक्रीया गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.
12. पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.
13. पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारीरिक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगासाठीचे आरक्षण लागु करण्यात आलेले नाही.
14. पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागु होत नाहीत.
15. **महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासुन अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे** (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे दिनांक 31/03/2023 पर्यंत अथवा चालु आर्थीक वर्षातील वैध असलेले नॉन क्रिमीलेअर सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमीलेअरचे तत्व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर मागास प्रवर्गांना लागू राहील.
16. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्रसादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या उमेदवारांनेही विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.
17. लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यात येणा-या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परीक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतीम निवडीस अपात्र ठरेल. उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा अर्जदार पोलीस पाटील पदावरील निवडीकरीता पात्र राहील.
18. समान गुण मिळाल्यास अंतिम निवड शासन निर्णय क्र डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र.592/पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.

1. पोलीस पाटलांचे वारस, त्यानंतर

mynaukri.com

2. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे अर्जदार, त्यानंतर
3. माजी सैनिक असलेले अर्जदार,त्यानंतर
4. वयाने जेष्ठ असलेले अर्जदार

पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि दोन मुले यांचा समावेश त्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही.

19. याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय,परिपत्रकांतील नेमणूकीसाठी इतरप्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.

20. हा जाहीरनामा/ जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकाराचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहे, असे समजण्यात येईल.

21. परीक्षा शुल्क भरणा न करण्यात आलेले अर्ज अपात्र करण्यात येतील.

**<u>ऑनलाईन (Online) अर्ज करण्याची पध्दत</u> :-**

A. Online अर्ज करणे प्रक्रीयेची थोडक्यात पद्धती खालीलप्रमाणे आहे.

B. प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

C.पात्रउमेदवाराला वेब-बेस्ड (Web-Based) ऑनलाईन अर्ज https://parbhani.gov.inकिंवा https://parbhani.applygov.netया वेबसाईटव्दारे सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

D. अर्जदार यांनी फार्म भरताना गावाचे नाव, आरक्षण याची खात्री करून अर्ज भरावे. अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

E. प्रत्यक्ष अर्ज भरण्यापूर्वी या पदाबाबतीची विस्तृत जाहिरातीचे वाचन करुन त्यातील अटी व शर्ती पडताळून पहाव्यात. सदर विस्तृत जाहिरात www.parbhani.gov.inवhttps://parbhani.applygov.netवर उपलब्ध आहे.

F. https://parbhani.applygov.netया संकेतस्थळावर 'अर्ज करा या Link वर click करावे. यानंतर संबंधीत पदासाठीचा अर्ज दिसून येईल.

G. यानंतर सर्व रकान्यामध्ये आपली माहिति व्यवस्थित भरावी.

H. उमेदवाराची Photo व सही व्यतिरिक्त कोणत्याही प्रमाणपत्र / अभिलेख्यांची Soft Copy अर्ज भरताना सोबत जोडावयाची (Upload करण्याची)आवश्यकता नाही.

I. सर्व माहिति भरल्यानंतर continue वर click करावे यामुळे भरलेल्या अर्जाचे पूर्नवलोकन (Review) करता येईल. तर अर्जातील माहिती बदलावयाची असल्यास edit form वर click करावे.

J. पूर्नविलोकनात (Review) सर्व माहिती बरोबर असल्यास Save and Continue वर click करावे.

K. यामूळे अर्जदाराने भरलेली माहिती संकेतस्थळावर Save होईल.उमेदवाराचा Form ID तयार होईल.

L. तयार झालेला Form ID भरतीच्या संपूर्ण प्रक्रीयेत उपयुक्त असल्याने तो उमेदवारांनी सांभाळून ठेवावा.

M. यानंतर उमेदवार आपला परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीतील विविध पर्यायाने (नेटबॅकींग, UPI(PhonePay, Google Pay etc.), डेबिट कार्ड / क्रेडीड कार्डइ.) भरु शकतात.

N. ऑनलाईन परीक्षा शुल्क भरल्यानंतर उमेदवारास पोचपावती मिळेल ती Download करुन व त्याची Print काढून सांभाळून ठेवावी.

O. विहीत वेळेनंतर संकेतस्थळावरून अर्ज भरण्याची प्रक्रीया काढून टाकण्यात येईल.

mygovnaukari.com

P. उमेदवारांनी अर्ज करताना त्यांचा Whatsappचालू असलेला भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) दिल्यास परीक्षा प्रक्रीयेतील सर्व टप्प्यांवर माहितीपाठविली जाईल. त्यामुळे उमेदवारांनी WhatsApp नंबर चालु असलेला मोबाईल क्रमांक टाकण्यास प्राधान्य द्यावे.

Q. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्यातील माहिती परिपुर्ण भरून भरलेल्या उमेदवाराची स्थिती/ परिक्षा प्रवेशपत्र / वेळापत्रक परिक्षाकेंद्र/बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल. जर उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला मोबाईल क्रमांक चुकीचा / अपूर्ण किंवा WhatsApp नसलेला असल्यास तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रीयेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच मोबाईल वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना हे कार्यालय जबाबदार असणार नाही यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

R. अर्जदारांनी प्रवेश पत्र दि. 24/01/2024 रोजीपासून Download करुन घ्यावयाचे आहेत.

S. यासाठी उमेदवारांनी https://parbhani.gov.inकिंवाhttps://parbhani.applygov.netया संकेतस्थळावर भेट देऊन आपला Form ID व त्यासोबत मोबाईल क्रमांक किंवा जन्म तारीख टाकल्यानंतर ते प्रवेशपत्र Download करु शकतात.

T. उमेदवारांना सदर प्रवेशपत्र हस्तगत करण्यात काही अडचणी असल्यास, प्रवेशपत्राची दुय्यम प्रत दिनांक 27/01/2024 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत या कार्यालयातून निर्गमित केली जाईल.

U. कोणत्याही उमेदवारास पोष्टाद्वारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही व प्रवेशपत्राशिवाय परीक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही.

V. सदरील परीक्षा खाली नमुद केल्याप्रमाणे परभणी मुख्यालयी घेण्यात येईल.

W. लेखी परीक्षा झाल्यावर दोन तासाने आदर्श उत्तरपत्रिका प्रकाशित केली जाईल. लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेमध्ये कोणताही **प्रश्न चुकीचा आढळल्यास लेखी परिक्षेनंतरदिनांक 29.01.2024 रोजी सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत त्याबाबत लेखी आक्षेप**sdoparbhani@yahoo.com व rdcparbhani@gmail.comया ईमेलवर पाठवावा.

X. उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

Y. उमेदवाराने भरलेल्या माहिती आधारे त्यास प्रवेशपत्र देऊन परीक्षेस पात्र करण्यात येईल. तेंव्हा अर्जदाराने Online अर्ज भरताना त्यांच्या पात्रतेनुसार वस्तुनिष्ठ, अचूक, संपुर्ण व खरी माहिती भरावी.

Z. Online अर्जासोबत कोणतेही प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे जोडू (upload) नयेत.

AA. उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्याने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्वतपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करुन मुळ कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारास भरतीच्या कोणत्याही टप्यावर अपात्र करण्याचे अधिकार पोलीस पाटील पदभरती निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

BB. ऑनलाईन पध्दतीने अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारासकोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.

mygovnaukari.com

CC. प्रस्तुत प्रक्रीया ही Online पध्दतीने असल्याने उमेदवाराने माहिती भरताना अचुक / खरी / जी कागदपत्रे / प्रमाणपत्रे उपलब्ध आहेत, अशीच माहिती भरावी. चुकीची / खोटी / दिशाभूल करणारी / अन्य इसमाची अथवा नंतर उशीराने कगदपत्रे / प्रमाणपत्रे उपलब्ध होणारी माहिती भरल्यास व भविष्यातनिदर्शनास आल्यास अथवा अशा उमेदवाराची निवड झाल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल व शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा दाखलकरण्यात येईल, यांची संबंधीतानी गांभिर्यपुर्वक नोंद घ्यावी.

DD. सर्व प्रक्रीयेमध्ये काही अडचणी असल्यास मदतीसाठी भमणध्वनी क्र.**9545330550**यावर सकाळी 10 ते सायं. 6.00 या कार्यालयाचे दिवसी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

EE. यापुढील सर्व माहिती जसे, पात्र/अपात्र उमेदवारांच्या याद्या विद्यार्थ्यांचे Online प्रवेशपत्र, उमेदवारांची प्राप्त गुण यादी, अंतिम निवड यादी इ. https://parbhani.gov.in व https://parbhani.applygov.net या संकेतस्थळावरील 'पोलीस पाटील भरती प्रक्रीया 2024' या शिर्षकाखाली उपलब्ध राहील.

FF. उमेदवाराने उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

GG. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झालाआहे असे असणार नाही.

HH. आस्थापनेवरील पद भरतीच्या अनुषंगाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणा-या सूचनाप्रमाणे आरक्षणाबाबत वइतर सूचनाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व त्या अटी जशास तशा लागू राहतील.

दिनांक:- 12/01/2024

ठिकाण:- परभणी

स्वाक्षरीत

**उपविभागीय दंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**पोलीस पाटील निवड समिती, परभणी.**

प्रतिलीपी

1. मा. जिल्हादंडाधिकारी परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी (शहर)/ परभणी (ग्रामीण)**(सदस्य)** यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरातआपले कार्यालयाचे सूचना फलकावर दर्शनी भागात प्रसिध्द करावी.
3. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (एन.आय.सी.) परभणी यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात या संकेतस्थळावर दिनांक .01.2024 रोजी प्रसिध्द करावी.
4. तालुका दंडाधिकारी परभणी यांना सदर जाहिरात आपले कार्यालयाचे सुचना फलकावर व संबंधीत गावात प्रसिध्दकरुन अहवाल सादर करणेची दक्षता घ्यावी.

Prewale

**उपविभागीय दंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**पोलीस पाटील निवड समिती, परभणी.**

mygovnaukari.com

# पोलीस पाटील पदभरती 2024 जिल्हा परभणी

## उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय परभणी अंतर्गत पोलीस पाटील पदाचे गावनिहाय आरक्षण

| अ.क्र. | तालुका | गावाचे नांव | आरक्षणाचे प्रवर्ग | महिला महिला / सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| 1 | परभणी | जोडपरळी | SC- अ जा | सर्वसाधारण |
| 2 | परभणी | मिरखेल | SC- अ जा | सर्वसाधारण |
| 3 | परभणी | इठलापुर देशमुख | SC- अ जा | सर्वसाधारण |
| 4 | परभणी | शिर्षी बु. | SC- अ जा | सर्वसाधारण |
| 5 | परभणी | ब्राम्हणगांव | SC- अ जा | सर्वसाधारण |
| 6 | परभणी | शेंद्रा | SC- अ जा | महिला |
| 7 | परभणी | रायपुर | SC- अ जा | महिला |
| 8 | परभणी | तामसवाडी | ST- अ ज | सर्वसाधारण |
| 9 | परभणी | वडगांव तर्फे पेडगांव | ST- अ ज | सर्वसाधारण |
| 10 | परभणी | पोरजवळा | ST- अ ज | सर्वसाधारण |
| 11 | परभणी | कौटूंबवाडी | ST- अ ज | महिला |
| 12 | परभणी | देवठाणा | SBC- वि मा प्र | सर्वसाधारण |
| 13 | परभणी | साटला | SBC- वि मा प्र | महिला |
| 14 | परभणी | इंदेवाडी | VJ-A- वि जा - अ | सर्वसाधारण |
| 15 | परभणी | तुळजापुर | NT-B – भ ज - ब | सर्वसाधारण |
| 16 | परभणी | उजळंबा | NT-B – भ ज - ब | महिला |
| 17 | परभणी | जलालपुर | NT-C – भ ज - क | सर्वसाधारण |
| 18 | परभणी | मिर्झापुर | NT-D – भ ज - ड | सर्वसाधारण |
| 19 | परभणी | पेगरगव्हाण | NT-D – भ ज - ड | सर्वसाधारण |
| 20 | परभणी | धारणगांव | NT-D – भ ज - ड | महिला |
| 21 | परभणी | साडेगाव | OBC – इ मा व | सर्वसाधारण |
| 22 | परभणी | आर्वी | OBC – इ मा व | सर्वसाधारण |
| 23 | परभणी | टाकळी कुंभकर्ण | OBC – इ मा व | सर्वसाधारण |
| 24 | परभणी | बोरवंड बु. | OBC – इ मा व | सर्वसाधारण |
| 25 | परभणी | भोगांव | OBC – इ मा व | सर्वसाधारण |
| 26 | परभणी | पान्हेरा | OBC – इ मा व | सर्वसाधारण |
| 27 | परभणी | नांदापुर | OBC – इ मा व | महिला |
| 28 | परभणी | सिंगणापुर | OBC – इ मा व | महिला |
| 29 | परभणी | मांडाखळी | OBC – इ मा व | महिला |
| 30 | परभणी | पिंपळगाव ठोंबरे | EWS- आर्थिकदृष्टया मागासलेला | सर्वसाधारण |
| 31 | परभणी | डिग्रस | EWS- आर्थिकदृष्टया मागासलेला | सर्वसाधारण |
| 32 | परभणी | ब्रम्हपुरी तर्फे पाथरी | EWS- आर्थिकदृष्टया मागासलेला | सर्वसाधारण |
| 33 | परभणी | सावंगी खुर्द | EWS- आर्थिकदृष्टया मागासलेला | सर्वसाधारण |

mygovnaukari.com

# पोलीस पाटील पदभरती 2024 जिल्हा परभणी

## उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय परभणी अंतर्गत पोलीस पाटील पदाचे गावनिहाय आरक्षण

| अ.क्र. | तालुका | गावाचे नांव | आरक्षणाचे प्रवर्ग | महिला महिला / सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| 34 | परभणी | टाकळी बोबडे | EWS- आर्थिकदृष्टया मागासलेला | महिला |
| 35 | परभणी | बाभळगाव | EWS- आर्थिकदृष्टया मागासलेला | महिला |
| 36 | परभणी | ठोळा | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 37 | परभणी | मांडवा | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 38 | परभणी | नांदगांव खुर्द | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 39 | परभणी | संबर | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 40 | परभणी | वांगी | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 41 | परभणी | शहापुर | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 42 | परभणी | धर्मापुरी | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 43 | परभणी | उखळदवाडी | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 44 | परभणी | उखळद | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 45 | परभणी | आलापुर पांढरी | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 46 | परभणी | आंबेटाकळी | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 47 | परभणी | पिंपळा | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 48 | परभणी | मांगणगांव | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 49 | परभणी | नरसापुर तर्फे पेडगांव | OPEN – खुला | सर्वसाधारण |
| 50 | परभणी | धार | OPEN – खुला | महिला |
| 51 | परभणी | ब्रम्हपुरी तर्फे लोहगांव | OPEN – खुला | महिला |
| 52 | परभणी | तरोडा | OPEN – खुला | महिला |
| 53 | परभणी | खानापुर तर्फे झरी | OPEN – खुला | महिला |
| 54 | परभणी | कुंभारी | OPEN – खुला | महिला |
| 55 | परभणी | मटक-हाळा | OPEN – खुला | महिला |

उपविभागीय दंडाधिकारी तथा अध्यक्ष,
पोलीस पाटील निवड समिती, परभणी.

mygovnaukari.com